दैनिक दिव्य मराठी

2026-08-04

भुसावळ (2)

विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जनजागृती

विद्यापीठाच्या मदतीने कुऱ्हे पानाचे येथे उपक्रम, फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी | कुऱ्हे पानाचे

डिजिटल युगात इंटरनेट आणि स्मार्टफोनचा वापर वाढल्यासोबतच सायबर गुन्हेगारीचे धोकेही वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर ऑनलाईन जगातील धोक्यांची पूर्वकल्पना देऊन नागरिकांना सतर्क करण्यासाठी भुसावळ तालुक्यातील कुऱ्हे पानाचे येथे विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या 'क्विक हील सायबर वॉरियर क्लब, क्विक हील फाउंडेशन' व 'महाराष्ट्र सायबर पोलीस' यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील राजाराम धोंडू माध्यमिक विद्यालयातील मातोश्री छबाई सभागृहात २७ जुलै रोजी पहिले सत्र पार पडले. ग्रामविकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष एकनाथ बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ऑनलाईन गेमिंग फ्रॉड, बनावट लिंक्स, ओटीपी व क्यूआर कोड फ्रॉड आणि सोशल मीडिया सुरक्षेसाठी 'टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन'चे महत्त्व पटवून देण्यात आले. इंटरनेट वापरताना वैयक्तिक माहिती, पासवर्ड व ओटीपी कोणाशीही शेअर करू नये, असा सल्ला विद्यार्थ्यांना देण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापक एस.डी. वाघ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांनी तज्ज्ञांनी सोप्या भाषेत समर्पक उत्तरे दिली.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्र

डिजिटल युगात ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून होणाऱ्या फसवणुकीच्या घटना लक्षात घेता, रेणुका माता ज्येष्ठ नागरिक मंडळ येथे दुसरे सत्र घेण्यात आले. जीवन विद्या मिशनच्या (मलकापूर) अध्यक्षा शैलजा टेकडे व कालिदास कळसकर यांची उपस्थिती होती. बँक किंवा पेन्शन अधिकारी असल्याचे भासवून येणारे बनावट कॉल्स, डिजिटल केवायसी अपडेट फ्रॉड आणि संशयास्पद लिंक्सबाबत ज्येष्ठ नागरिकांना सतर्क करण्यात आले. कोणतीही बँक फोनवर गोपनीय माहिती मागत नाही, या मुद्द्यावर जोर दिला.

सायबर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवण्याचे निर्देश

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन विद्यापीठाचे स्वयंसेवक अक्षय पाटील, लोकेश पाटील, तनिषा महाजन आणि तेजस्वीनी पाटील यांनी केले. त्यांनी प्रातिनिधिक उदाहरणांद्वारे उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. तसेच, फसवणूक झाल्यास तातडीने '१९३०' या सायबर हेल्पलाइन नंबरवर तक्रार नोंदवण्याचे निर्देश दिले. जेणेकरून तातडीने ठगांचा बंदोबस्त करणे शक्य होईल.

सत्य सांगू, बिनधास्त
दिव्य मराठी